MHRG190001442024

**::विशेष दरखास्त क्र.१७/२०२४ मधील निशाणी क्र.१९ वरील आदेश ::**

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी मुळ अर्जदार क्र.३ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन की, मुळ अर्जदार क्र.३ हे दिनांक २०.०६.२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत मुळ अर्जदार क्र.३ यांचे वारस म्हणजेच प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ ते ५ मुलगे, अर्जदार क्र.६ पत्नी आणि अर्जदार क्र.७ व ८ मुली होय. सदर वारसांशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाहीत. सबब सदरहु अर्जदार यांनी प्रस्तुतचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल केला आहे.

३. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे. त्यांचे असे कथन असे की, अर्जास योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही तसेच मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्याने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारातर्फे वकील तसेच सामनेवाला क्र.१ व २ तर्फे सहाय्यक सरकारी वकील

श्री.योगेश तेंडुलकर व सामनेवाला क्र.३ तर्फे श्रीमती डी.ए.कामत यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०५. अर्जदार यांनी दिलेला अर्ज, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुतचे प्रकरण भुसंपादन अर्ज क्र.५६/२००६ मध्ये झालेला न्यायनिर्णय व हुकूमनाम्याप्रमाणे अंमलबजावणीसाठी दाखल केले आहे. मुळ अर्जदार क्र.३ मयत झाल्याने प्रस्तुतचा वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत मुळ अर्जाचा योग्य न्यायनिवाडा करण्यासाठी सर्व पक्षकारांना प्रकरणामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेले कारण संयुक्तीक असुन अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: आदेश ::**

१. अर्जदार यांचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार म्हणुन सामील होऊन दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करण्यात यावी.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA
Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.03 13:20:49 +0530

महाड (**श्रीमती एच.आर.जाधव**)
दिनांक ०३.०१.२०२६ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड